आरोग्य सेवा आयुक्तालय (महाराष्ट्र राज्य)

आरोग्य भवन, ६ वा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी डी मेलो रोड, मुंबई - ४०० ००१.

कार्यालय	दूरध्वनी	Website : http://maha-arogya.gov.in
संचालक (वैयक्तिक)	२२६२१०३१-३६	Email : dhs_2005@rediffmail.com
सहसंचालक (रुग्णालये - राज्यस्तर)	२२६२१००६	Email : jdhs03@gmail.com
सहसंचालक (प्राआकेंद्र - जिपस्तर)	२२६११४७१	Fax No. 022-22621034 / 22620234 (DHS)

परिपत्रक

क्र. आसेआ/ कक्ष-३/ टे-४/ वेडशीट व पिलोकव्हर/ मार्गदर्शक सूचना/ २०२५,
दिनांक: २० ऑक्टोबर, २०२५

प्रति,

१. उपसंचालक आरोग्य सेवा, (सर्व),
२. जिल्हा शल्यचिकित्सक, (सर्व),
३. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
४. वैद्यकिय अधिक्षक, जिल्हा/ विभागीय संदर्भ सेवा/ स्त्री/ सामान्य/ उपजिल्हा/ ग्रामीण रूग्णालये, (सर्व)
५. वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, (सर्व)

विषय - राज्यातील आरोग्य संस्थांमध्ये रुग्णांकरीता दर दिवशी वापरात येणा-या बेडशीट्स व पिलोकव्हर प्रतिदिन रंगानुरूप बदलणेबाबत मार्गदर्शक सूचना.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीत असलेल्या सर्व आरोग्य संस्थांना राज्यस्तरावरून आवश्यक असणारी रूग्णालयीन कापड-चोपड (लिनन) खरेदी करून पुरवठा करण्यात येतो. तसेच जिल्हास्तरावर उपलब्ध असलेल्या अनुदानातूनही आवश्यकतेनुसार रूग्णालयीन कापड-चोपड (लिनन) ची खरेदी करण्यात येते. त्यानुषंगाने, रूग्णहिताच्या दृष्टीने व रूग्णालयीन स्वच्छतेच्या दृष्टीने राज्यातील सर्व आरोग्य संस्थांमध्ये रुग्णसेवेकरीता दर दिवशी वापरण्यात येणा-या बेडशीटस् आणि पिलोकव्हरची नियमित स्वच्छता राखणे तसेच ती नियमित प्रतिदिन रंगानुरूप बदलणे आवश्यक आहे.

मा. प्रधान सचिव, सा.आ. वि., मंत्रालय, मुंबई यांनी आरोग्य संस्थांच्या तपासणी व पर्यवेक्षणावेळी आरोग्य संस्थांमधील बेडशीटस् आणि पिलोकव्हरची नियमित स्वच्छता राखणे तसेच ती नियमित प्रतिदिन वारांनुसार रंगानुरूप (Colour Code) बदलणेबाबत मौखिक सुचना दिलेल्या आहेत. तसेच, आयुक्तालय स्तरावरून वेळोवेळी आयोजित करण्यात येणा-या आढावा बैठका/ व्ही.सी आढावा बैठकांमध्ये सर्व अधिनस्त कार्यालयांना आदेशित करण्यात आले आहे. परंतु, अद्यापही ब-याच रूग्णालयांमध्ये वापरात येणा-या बेडशीटस् आणि पिलोकव्हरची नियमित स्वच्छता व त्या रंगानुरूप (Colour Code) वारांनुसार बदलल्या जात नसल्याचे पर्यवेक्षण भेटीदरम्यान निदर्शनास आले आहेत.

त्यामुळे, रूग्णहिताच्या व रूग्णालयीन स्वच्छतेच्या दृष्टीने आरोग्य संस्थांमध्ये वापरण्यात येणा-या बेडशीटस् आणि पिलोकव्हरची नियमित स्वच्छता व त्या रंगानुरूप वारांनुसार बदलणेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत:-

१. रुग्णालयात रुग्णसेवेकरीता वापरण्यात येणा-या बेडशीट्स आणि पिलोकव्हर प्रति बेड (रुग्ण खाटा) करीता **पाच सेट** असणे आवश्यक आहे. त्यानुसार, बेडशीटस् आणि पिलोकव्हरचा साठा उपलब्ध असणे आवश्यक आहे.

२. रूग्णालयांतील बेडशीट्स आणि पिलोकव्हर प्रतिदिन बदलणेकरीता, आठवडयातील वारानुसार खालीलप्रमाणे रंग (Colour Code) निश्चित करण्यात आले आहेत. त्यामुळे खाली दिलेल्या वेळापत्रकानुसार रूग्णालयांच्या कक्षातील बेडशीट्स आणि पिलोकव्हर बदलले जातील याची दक्षता घेण्यात यावी.

अ.क्र.	वार	रंग
१.	सोमवार	**पांढरा**
२.	मंगळवार	**आकाशी/ हिरवा**
३.	बुधवार	**गुलाबी**
४.	गुरुवार	**पांढरा**
५.	शुक्रवार	**आकाशी/ हिरवा**
६.	शनिवार	**गुलाबी**

३. अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक/ रूग्णालय प्रमुखांनी त्यांचे नियमित दैनंदिन भेटीदरम्यान (Daily Round) रूग्णालयांच्या कक्षांमध्ये वापरात येणा-या बेडशीट्स व पिलोकव्हर वरीलप्रमाणे नमुद वेळापत्रकाचे पालन करून नियमित वारांनुसार बदलले जात असल्याचे तसेच ते फाटलेले/ जीर्ण/ अस्वच्छ नसल्याबाबत खातरजमा करावी.

४. जिल्हास्तरावर, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेद्वारे आरोग्य संस्थांचे पर्यवेक्षण भेटीदरम्यान अधिनस्त रूग्णालयांतील बेडशीट्स आणि पिलोकव्हर स्वच्छ असल्याचे तसेच, उपरोक्त तक्त्यामध्ये निश्चित केलेल्या रंगांनुसार (Colour Code) त्या वेळोवेळी बदलल्या जात असल्याची खातरजमा करण्यात यावी.

५. रूग्णालयांतील बेडशीट्स आणि पिलोकव्हर प्रतिदिन बदलणे आवश्यक आहे. विशेषत: नवीन आंतररुग्ण दाखल झाल्यास प्रत्येक रुग्णाकरीता प्रत्येकवेळी बेडशीटस् आणि पिलोकव्हर बदलणे आवश्यक आहे.

६. रूग्णालयांतील बेडशीट्स आणि पिलोकव्हर उपरोक्तप्रमाणे निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार बदलणेबाबत संबंधित रुग्णालयीन अधिसेविका, परिसेविका, अधिपरिचारीका यांना तशा सुचना देण्यात याव्यात.

७. आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध असणा-या बेडशीटस् आणि पिलोकव्हर हे स्वच्छ आणि निर्जंतुक असणे आवश्यक आहे. त्याकरीता, ते नियमित स्वच्छ केले जाईल याची दक्षता घेण्यात यावी. विशेषत: प्रसुति कक्ष व प्रसुतिगृहामध्ये याबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे.

८. बेडशीटस् आणि पिलोकव्हर फाटलेले आणि जीर्ण नसावे. तसे, निदर्शनास आल्यास ते शासकीय नियमांनुसार तात्काळ निर्लेखित करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

९. उपरोक्त वेळापत्रकामध्ये विहीत केलेल्या रंगांनुसार बेडशीट्स व पिलोकव्हर उपलब्ध करण्याबाबत राज्यस्तरावरुन पुरेसा साठा उपलब्ध न झाल्यास, स्थानिक स्तरावरुन जिल्हा वार्षिक योजना व विविध स्त्रोतांद्वारे उपलब्ध निधीतून सदर रंगांनुसार बेडशीट्स व पिलोकव्हर उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही करण्यात यावी व आरोग्य संस्थांमध्ये त्यांचा पुरेसा साठा उपलब्ध राहील याची दक्षता घेण्यात यावी.

१०. आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध असणा-या बेडशीट्स आणि पिलोकव्हरची स्टॉक बुकमध्ये (Stock Book) नोंद घेणे आवश्यक आहे.

११. रूग्णालयांच्या कक्षांमध्ये वापरात येणा-या बेडशीट्स व पिलोकव्हर फाटलेले/ जीर्ण/ अस्वच्छ असल्याबाबत अथवा विहीत केलेल्या वेळापत्रकाचे पालन होत नसल्याबाबत निदर्शनास आल्यास, संबंधितांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल. तसेच, याबाबत मा. लोकप्रतिनिधी, पत्रकार, रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांचेकडून कोणतीही तक्रार उद्भवल्यास त्यास सर्वस्वी जिल्हा शल्यचिकित्सक/ जिल्हा आरोग्य अधिकारी/ रूग्णालय प्रमुख जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

तरी, उक्त मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करून राज्यातील सर्व आरोग्य संस्थांनी बेडशीट्स आणि पिलोकव्हरची स्वच्छता व ती रंगानुरूप वारांनुसार बदलणेच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करावी.

sugolt

(डॉ. सुनिता गोल्हाईत)
सहसंचालक आरोग्य सेवा,
रुग्णालये (राज्यस्तर) मुंबई.

प्रत :-

१. मा. संचालक - १/ २, आरोग्य सेवा, मुंबई/ पुणे
२. मा. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (कुटुंब कल्याण), पुणे
३. सहसंचालक, आरोग्य सेवा प्राआकेंद्र (जिपस्तर), मुंबई

प्रत सविनय सादर :-

१. मा. सचिव (१), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, मुंबई